जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३१ दिनांक - १२/०१/२०२४**

सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## कोम्बींग ऑपरेशन दरम्यान संशयीतरित्या फिरणा-या आरोपीकडुन एक पिस्टल व एक जिवंत काडतुस केले हस्तगत.

दि.१०/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन हद्दीत कोम्बींग ऑपरेशन दरम्यान रेकॉर्ड वरील आरोपी चेक करीत असताना **पोलीस अंमलदार आबा उत्तेकर, राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर** यांना त्याचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खंडोजी बंडोजी चव्हाण शाळेच्या पाठीमागे, मोकळया मैदानात, धायरी पुणे येथे एक इसम जवळ एक गावठी पिस्टल घेवुन थांबलेला आहे. अशी बातमी मिळाल्याने सदरची बातमी **सहा पोलीस निरीक्षक सचिन निकम** यांना कळविली असता त्यांनी ती बातमी वरीष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक(गुन्हे) सिंहगड रोड पोलीस ठाणे, पुणे शहर यांना कळविली असता वरिष्ठांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन पुढील योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले

लागलीच सपोनि सचिन निकम यांनी सोबतच्या स्टाफाह खंडोजी बंडोजी चव्हाण शाळाचे पाठीमागे, नंदीबावरा मित्र मंडळाचे जवळ, मोकळया मैदानात, धायरी पुणे येथे येवुन मिळालेल्या बातमी प्रमाणे खात्री करता बातमीतील वर्णनाचा इसम सदर ठिकाणी उभा असल्याचे दिसला तो त्याठिकाणा वरुन आमची नजर चुकवुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यास स्टाफचे मदतीने काही अंतरावर पकडुन त्यास नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव व पत्ता **प्रणव विनोद कुंभार वय १९ वर्षे रा.राजरत्न अपार्टमेंट बेनकर वस्ती चव्हाण शाळेजवळ धायरी पुणे** असे सांगितले असता त्याची अंगझडती घेता त्याचे कंबरेस जिन्स पॅन्टच्या आत मध्ये एक ४५,०००/-रु. किं.चे पिस्टल व पॅन्टचे खिश्यात ५००/-रु. किं.चे एक जिवंत काडतुसे असा एकुण ४५,५००/-रु. किं.चा मुद्देमाल जप्त कऱण्यात आले असुन पुढील तपास पोलीस उप निरीक्षक गणेश मोकाशी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३ पुणे श्री.संभाजी कदम, मा.सहा पोलीस आयुक्त,सिंहगड रोड विभाग पुणे श्री.आप्पासाहेब शेवाळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पोलीस स्टेशन श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.जयंत राजुरकर, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक श्री.सचिन निकम, पोलीस उप निरीक्षक गणेश मोकाक्षी, पोलीस अंमलदार,आबा उत्तेकर,संजय शिंदे,राजु वेगरे,देवा चव्हाण,शिवाजी क्षिरसागर,राहुल ओलेकर,सागर शेडगे,स्वप्नील मगर,अमोल पाटील,अविनाश कोंडे,विकास बांदल,विकास पांडुळे,दक्ष पाटील यांचे पथकाने केली.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर
सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर
सिंहगडरोड पोलीसस्टेशन
पुणे